दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ४ थे अंक २८ वा गुरूवार दि.२७ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# जनतेने नाकारलेल्या महायुती सरकारचे हे शेवटचे अधिवेशन

मुंबई : प्रतिनिधी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुती सरकार आता पावसाळी अधिवेशनाला सामोरे जाणार आहे. अधिवेशनापूर्वी विरोधी पक्षाने सरकारच्या चहापानावर बहिष्कार टाकला आहे. लोकसभेच्या निवडणुकीत राज्यातील त्यांच्या फुगलेल्या छातीची हवा काढण्याचे काम जनतेने केले आहे, त्यांचे विशेष अभिनंदन आहे. जनाधार गमवलेल्या या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन आहे असे म्हणत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची बैठक पार पडली. बैठकीला काँग्रेस विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते सतेज पाटील, भाई जगताप, राजेश राठोड, राष्ट्रवादी (शरद पवार) अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, शिवसेना (उद्धव ठाकरे) अंबादास दानवे, शेकाप जयंत पाटील, सपा अबू आझमी उपस्थित होते. त्यानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत वडेट्टीवार यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करत वडेट्टीवार म्हणाले, महायुतीने राज्याला खड्ड्यात घातले आहे, हे अनैतिक संगत असलेले सरकार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत राज्यातील त्यांच्या फुगलेल्या छातीची हवा काढण्याचे काम जनतेने केले त्यांचे विशेष अभिनंदन आहे. जनाधार गमवलेल्या या सरकारचे हे शेवटचे अधिवेशन आहे. तिन्ही पक्षांची अवस्था महाराष्ट्राने पाहिली. भाजपने दोन वर्षांपूर्वी लोकशाहीचा गळा घोटळा हे जनतेने पाहिले. लोकसभेच्या माध्यमातून त्यांनी हुकूमशाही चालणार नाही हे दाखवून दिले. हा संदेश आताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत दाखवून दिला. हे जुमलेबाजी करणारे सरकार आहे, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली. शेतक-यांचा विश्वासघात सरकारने दीडपटीने हमी भाव दिला नाही. जो हमीभाव २०१९ ला मिळत होता तोच हमीभाव




आता देत असेल तर त्यांनी लोकांना धोका दिला आहे. शेतक-यांचा विश्वासघात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी केला आहे. शेतीच्या अवजारे, बियाणे, खतांवर जीएसटी लावते आणि हेलिकॉप्टर, हिरे स्वस्त केले आहेत. यांनी तर मरणानंतर अन्त्यसंस्कारासाठी लागणा-या साहित्यावरही जीएसटी लावली आहे, अशी टीकाही त्यांनी केली.घोटाळेबाज सरकार ५० किलोच्या युरीयाच्या बॅगवर ५० रुपयांची वाढ केली पण युरीयाचे वजन मात्र ४० किलो केले. कांदा निर्यात नाकारली जाते. केंद्रातले सरकार शेतकरीविरोधी आहे. आणि इथले नेते त्याला समर्थन देतात. हे त्रिकुटाचे घोटाळेबाज, टेंडरबाज सरकार आहे. दलालांना प्रत्येक मजल्यावर केबिन दिली.

# आजपासून विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन! 'हे' मुद्दे गाजणार

मुंबई : राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन गुरुवार, दि. २७ जूनपासून मुंबईतील विधान भवनात सुरू होत आहे. तसेच दि. २८ जून रोजी राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडला जाणार आहे.

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन दि. २७ जून ते दि. १२ जुलै या कालावधीत होणार असून, एकूण १३ दिवस कामकाज चालणार आहे. शनिवार दि. २९ जून रोजी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी विधिमंडळाचे कामकाज सुरू राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. येत्या ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजेल. दरम्यान, अतिरिक्त अर्थसंकल्पात आगामी निवडणुकीचे प्रतिबिंब उमटेल, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांसाठी सर्वाधिक तरतूद करतानाच, युवा वर्ग, महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार स्त्रियांसाठी भरीव तरतूद केली जाण्याची शक्यता आहे.

हे वाचलंत का? - मुंबईतील ३१ दरडप्रवण क्षेत्र संरक्षित करण्याच्या कामाला वेग; मुख्यमंत्री शिंदेंनी केली पाहणी

हे मुद्दे गाजणार! यंदाच्या पावसाळी अधिवेशनात दुष्काळी स्थिती, दूध प्रश्न, कांदा प्रश्न, घाटकोपर होर्डिंग दुर्घटना, बोगस बियाणे, शक्तीपीठ महामार्ग, मराठा-ओबीसी आरक्षण वाद, पेपर फुटी, पुणे हिट अँड रन जामीन प्रकरण, पुण्यातील अंमली पदार्थ आदी मुद्दे गाजण्याची शक्यता आहे.

# जिल्हा परिषद प्रशाला पारुनगर येथे आठवीच्या वर्गास मान्यता

## मुरुड ग्रामस्थ व दिलीप दादा नाडे यांनी मानले आमदार धिरज विलासराव देशमुख यांचे आभार

लातूर / प्रतिनिधी :- जिल्हा परिषद प्रशाला पारूनगर मुरुड येथे पहिली ली ते सातवीपर्यंतचे वर्ग आहेत. यावर्षी या शाळेत १,१०० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उज्वल शिक्षणाची परंपरा असलेली महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेची ही एकमेव शाळा आहे, जिथे प्रवेशासाठी प्रतीक्षा यादी लागते. शालेय शिक्षण समिती व मुख्याध्यापक यांनी इयत्ता आठवीचा वर्ग मिळावा याकरिता एप्रिल २०२४ मध्ये प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल केला होता, मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे याबाबतची मान्यता मिळण्यास अडसर निर्माण झाला होता. जिल्हा परिषद प्रशाला पारुनगर येथे यावर्षी सातवीमधून एकूण ९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मात्र, इयत्ता आठवी मध्ये प्रवेशासाठी खासगी शिक्षण संस्थेच्या शाळेत प्रवेश घ्यावा लागत असल्यामुळे पालकांची आर्थिक कुचंबना होत असल्याने जवळपास ७० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांचा टीसी शाळेमधून नेली नाही. यातून ७० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होऊ नये, ही बाब लक्षात घेऊन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य श्री दिलीप दादा नाडे यांनी या विषयाची माहिती लातूर ग्रामीणचे आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांना दिली. शालेय प्रशासन व विद्यार्थ्यांच्या पालकाची मागणी लक्षात घेता आमदार धिरज देशमुख यांनी तातडीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनमोल सागर यांना इयत्ता आठवीच्या वर्गास मान्यता मिळण्यासंदर्भात पत्र पाठवले. त्यानुसार मुरुड येथील पारुनगर जिल्हा परिषद प्रशाला मध्ये इ. ८ वी च्या वर्गास मान्यता मिळाली आहे. आज रोजी एकूण ७० विद्यार्थी आठववी मध्ये शिकत असून या प्रशालेत त्यांचे मोफत शिक्षण होणार असल्याने कसलेही शैक्षणिक



शुल्क भरावे लागणार नाही. याबद्दल लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांचे दिलीप दादा नाडे, जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक हेमंत जोशी, माजी सरपंच अभयसिंह नाडे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष समाधान नाडे, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस डॉ. दिनेश नवगिरे, सदस्य गणेश नाडे, मुरुडचे ग्रामस्थ व पालक यांनी आभार व्यक्त केले.

# राजश्री शाहू महाराज यांची जयंती साजरी



लातूर :--- आरक्षणाचे जनक राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० वी जयंतीनिमित्त लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने राजश्री छत्रपती शाहू महाराज पुतळा परिसरात कमलाकर कांबळे यांच्या हास्ते राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करण्यात आले या वेळी समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, शंकर जाधव,अर्णव गंगणे, स्वस्तिक कोथिंबीरे,इत्यादी उपस्थित होते

# लातूर जिल्हा तलाठी संघाच्या जिल्हाध्यक्षपदी गोविंद शिंगडे,

## सरचिटणीसपदी अविनाश पवार तर महेश हिप्परगे यांची महाराष्ट्र प्रतिनिधी म्हणून निवड

लातूर : लातूर जिल्हा तलाठी संघाच्या जिल्हाध्यक्षपदी गोविंद शिंगडे, जिल्हा सरचिटणीसपदी अविनाश पवार तर माजी जिल्हाध्यक्ष महेश हिप्परगे यांची महाराष्ट्र प्रतिनिधी म्हणून २४ जून रोजी आयोजित बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली. लातूर जिल्हा तलाठी संघाचे जिल्हाध्यक्ष महेश हिप्परगे व महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे संघटक भीमाशंकर बेरुळे यांनी २० जून रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे जिल्ह्यातील तलाठी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची २४ जून रोजी घरणी येथील सभागृहात नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत माजी जिल्हाध्यक्ष महेश हिप्परगे, मंडळ अधिकारी पंडीत जाधव, तलाठी संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष त्र्यंबक चव्हाण, प्रशांत तेरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेचे राज्य प्रतिनिधी म्हणून माजी जिल्हाध्यक्ष महेश हिप्परगे, लातूर जिल्हा तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी गोविंद शिंगडे तर जिल्हा सरचिटणीसपदी अविनाश पवार यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यातआली. निवडीनंतर भीमाशंकर बेरुळे, पंडीत जाधव यांच्या हस्ते नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी लातूर तालुका अध्यक्ष प्रणित बोधने, सचिव वैशाली सूर्यवंशी, उपाध्यक्ष रेणुका पुरी, तलाठी डी आर शिंदे, विलास कतलाकुटे, गोपाळ धुमाळ, विशाल स्वामी, गोविंद तावरे, मंडळ अधिकारी नागनाथ खंदाडे, बेजगमवार उदगीर तालुकाध्यक्ष पंकज कांबळे, सचिव तानाजी शिंदे, जिल्हा प्रतिनिधी अमोल रामशेट्टी, मंडळ अधिकारी गणेश हिवरे, गुंडरे, जिल्हा प्रतिनिधी विकास बिराजदार, औसा तालुकाध्यक्ष भागवत सोनवते, सचिव हेंबाडे, सुरज स्वामी, निलंगा तालुकाध्यक्ष देशमुख, सचिव निंबाळकर, अहमदपूर तालुकाध्यक्ष महेश गुंफिले, सचिव गिरी, बिराजदार, जोशी, देवणी तालुकाध्यक्ष गोपाळ बिराजदार, भंडारे, कुकर, दिलीप देवकते, रेणापूर तालुकाध्यक्ष रत्नदीप भोसले, सचिव अमोल काळे, कमलाकर तिडके, विष्णू साळी, चाकूर अध्यक्ष अविनाश पवार, सचिव कमलाकर आरडले, प्रशांत तेरकर, जळकोट अध्यक्ष उमाकांत उमाटे, सचिव स्वप्नील बेंबडे, शिरूर आनंतपाळ अध्यक्ष गणेश भारती, संदेश कुलकर्णी, नवनाथ खंदाडे आदींसह दीडशे तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.

**लातूरचे कर्तव्यदक्ष तहसीलदार सौदागर तांदळे यांनी लातूर जिल्हा तलाठी संघटनेत मोठ्या प्रमाणात लुडबुड करून जिल्हा तलाठी संघटनेत फूट पाडण्याचे षडयंत्र केले. त्यांचे हे षडयंत्र तलाठी संघटनेचे राज्य संघटक भीमाशंकर बेरूळे यांनी हाणून पाडले. मी स्वत:जिल्हा तलाठी संघटना मध्ये फूट पडू नये म्हणून व एकजूट राहावे यासाठी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. नूतन पदाधिकाऱ्यांना माझ्या शुभेच्छा असतील ...... महेश हिप्परगे, महाराष्ट्र प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य तलाठी संघ.**





# समता दिंडीतून राजर्षी छत्रपती शाहू विचारांचा जागर !






लातूर :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीदिनी सामाजिक न्याय दिनानिमित्त समाज कल्याण विभागाच्यावतीने समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून सामाजिक न्यायाचा संदेश देत राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा जागर करण्यात आला. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक येथून समता दिंडीला सुरुवात झाली. समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, लातूर जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त तेजस माळवदकर, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, प्रादेशिक समाज कल्याण उपायुक्त कार्यालयातील समाज कल्याण अधिकारी विलास केंद्रे, उपशिक्षणाधिकारी मधुकर ढमाले यावेळी उपस्थित होते. प्रारंभी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समता दिंडीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी संविधान, सामाजिक न्याय, व्यसनमुक्ती, वृक्षारोपण आदी विषयावर संदेश देणारे फलक हाती घेत राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची माहिती दिली. राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक येथून निघालेली ही दिंडी गंजगोलाई, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, गंजगोलाई, महात्मा गांधी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आल्यानंतर दिंडीचा समारोप करण्यात आला. ज्ञानेश्वर विद्यालय, यशवंत विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, देशिकेंद्र विद्यालय, राजमाता जिजामाता विद्यालय, राजस्थान विद्यालय, परिमल विद्यालय, व्यंकटेश विद्यालय आणि कृपासदन इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी या दिंडीमध्ये सहभागी झाले होते.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### समतेचे दीपस्तंभ; राजर्षी शाहू

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे आपल्या राज्यास 'फुले–शाहू–आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे संबोधले जाते. छत्रपती शाहू महाराज यांची २६ जून रोजी जयंती साजरी केली जाते. जयंतीनिमित्त त्यांच्या महान कार्याबाबत

२६ जून हा राजर्षी शाहू महाराजांचा जन्मदिन 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो.ब्रिटिश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी या काळात शाहू राजांनी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली तसेच सनातनी वर्गाच्या विरोधाला न जुमानता अस्पृश्य व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

शाहू महाराज अस्पृश्यता निर्मूलनासाठी आपल्या कुटुंबापासून प्रयत्न करत होते. एकदा शाहू महाराज शिरोळला गेले होते. तेव्हा महाराजांनी चहासाठी म्हणून शिरोळच्या तुकाराम कांबळे यांना चहाचे दुकान काढून दिले. ते नेहमी गंगाराम कांबळे यांच्या हॉटेलमध्ये स्वतः जात. चहा आणि फराळ घेत आणि त्यामुळेच अस्पृश्यतेचे वलय हळूहळू सौम्य व्हायला लागले. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने शाहू महाराजांनी अस्पृश्यांना स्वावलंबी बनवण्याचे ठरवले. त्यासाठी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले, दुकाने, हॉटेल्स काढण्यासाठी प्रोत्साहन दिले तसेच आर्थिक मदत देखील देऊ केली. कोल्हापूर येथील भवानी मातेचे मंदिर त्यांनी अस्पृश्य समजल्या जाणार्या समाजासाठी खुले केले.

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. ५०० ते १००० लोकवस्तीच्या गावांमध्ये शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रतिमहिना १ रूपया दंड आकरण्याची कायदेशीर तरतूद केली. यामागचा उद्देश लोकांनी आपल्या मुलांना दररोज शाळेत पाठवावे, असा होता. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी १९१९ मध्ये सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची पद्धत बंद केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला चालवावा यासाठी शिक्षण देणार्या पाटील शाळा, प्रत्यक्ष व्यावसायिक शिक्षण देणार्या, तंत्रे व कौशल्ये शिकवणार्या शाळा असेही उपक्रम महाराजांनी राबवले. शाळा, दवाखाने, पाणवठे, सार्वजनिक विहिरी, सार्वजनिक इमारती इत्यादी ठिकाणी अस्पृश्यांना समानतेने वागवावे असा आदेश त्यांनी कोल्हापूर संस्थानात काढला.

आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता मिळावी म्हणून त्यांनी यशस्वीपणे प्रयत्न केले. जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. त्यांनी धनगर जमातीतील राजघराण्याशी आपल्या घराण्याचे सोयरेसंबंध घडवून आणले. जातिभेद मोडण्यासाठीचा हा कृतिशील प्रयत्न होता. १९१७ मध्ये त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्याचबरोबर जर एखाद्या स्त्रीला तिच्या घरातून वाईट वागणूक मिळत असेल तर अशा अपराधींना सहा महिने कारावास व दोनशे रुपये दंड करण्याची तरतूद देखील कायद्यात होती. घटस्फोट आणि वारसा कायदा सुद्धा त्यांनी पास केला होता. त्याचबरोबर स्त्रियांच्या शिक्षणाबाबत एक पाऊल पुढे जात त्यांनी राजाराम कॉलेजमध्ये शिकणार्या सर्व मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतला होता.

बहुजन समाजाला राजकीय निर्णयप्रक्रियेत सामावून घेण्यासाठी त्यांनी १९१६ मध्ये निपाणी येथे 'डेक्कन रयत असोसिएशन' ही संस्था स्थापली. वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेले वेदोक्त प्रकरण शाहू महाराजांच्याच काळात झाले. सामाजिक बंधुभाव, समता, दलित व उपेक्षित बांधवांचा उद्धार, शिक्षण, शेती, उद्योगधंदे, कला, क्रीडा व आरोग्य इत्यादी महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अद्वितीय स्वरूपाचे कार्य केले. एकूण २३ वसतिगृहे अनेक जाती–जमातींसाठी, धर्मासाठी बांधली होती. त्यामुळे प्रत्येक जातीच्या लोकांना स्वतःचा विकास करण्याची संधी उपलब्ध झाली. ही वसतिगृहे सर्व जाती–धर्मासाठी खुली ठेवली. त्यामुळेच मराठा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांसह सर्व जातींमधील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याची समान संधी मिळाली.

मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के राखीव जागांची (आरक्षणाची) तरतूद करून त्याची त्वरित अंमलबजावणी देखील महाराजांनी केली.

आपल्या संस्थानात जोगत्या–मुरळी प्रतिबंधक कायदा करून ही पद्धत बंद पाडली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. कोल्हापूर संस्थानामध्ये सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचेही महत्त्वाची जबाबदारी महाराजांनी पार पाडली. पुढील काळात या चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याची महत्त्वाची जबाबदारी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पार पाडली. यासाठी कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून शिक्षणातून बहुजन समाजाचा सर्वांगीण विकास हे सूत्र अंगिकारले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काढलेले 'मूकनायक' हे पाक्षिक आर्थिक अडचणीमुळे बंद पडले होते. महाराजांच्या हे लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ आर्थिक मदत केली. 'शाहूराजे हे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ होते' असे गौरवोद्गार बाबासाहेब आंबेडकर यांनी काढले होते.शाहू राजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रांतील कलावंतांना राजाश्रय देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्कार्य केले. तरुणांना पदवीपर्यंत पूर्ण शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी राजाराम कॉलेजची स्थापना केली. वेठबिगारी ही पद्धत बंद केली. बारा बलुतेदार यांना कोणताही आवडीचा व्यवसाय करता यावा याची मुभा दिली आणि कामाचा मोबदला पैशाच्या स्वरूपात घेऊ शकतात असे आवाहन केले होते. महार वतन पद्धत १९१८ मध्ये कायद्याने बंद केली.'स्पिनिंग ॲन्ड विव्हिंग मिल'ची स्थापना, शाहुपुरी व्यापारपेठेची स्थापना, गुळाच्या बाजारपेठेची निर्मिती, शेतकर्यांच्या सहकारी संस्थांची स्थापना, शेतकर्यांना कर्जे उपलब्ध करून देणार्या पतसंस्था यांची स्थापना केली. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रांत राजर्षींनी नवनवे प्रयोग केले. शेती संशोधनावर भर दिला.

# कोणत्याही नशेच्या आहारी जाणे घातकच; सावधान!

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ,ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. नुकतेच २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगितले जाते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेलमध्ये सुध्दा ड्रग्सचा पुरवठा होतो हे नुकत्याच एका पुण्याच्या हॉटेलवरून लक्षात आले आहे. त्यामुळे ते हॉटेल प्रशासनाकडुन सील करण्यात आले आहे. अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात.परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला छल्ली व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेतउभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की नशेली वस्तूला टाटा–बाय–बाय करू या.

********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजि विद्यापिठ प्रतिनिधी नागपूर) .
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# भारतीय रेल्वेवर टीका करताना या गोष्टीही लक्षात घ्या

भारतीय किंवा इतर कोणत्याही रेल्वे आस्थापनेत अधिकृतरीत्या कार्य मी केले नसले, तरी भारतीय रेल्वेच्या अधिकारी आणि इतर प्रशिक्षण संस्थाने येथे मला प्रदीर्घ काळ मानद व्याख्याता म्हणून हा केवळ रेल्वेशीच संबंधित विषय शिकविण्याचे काम अभियांत्रिकीचा अभ्यासक या नात्याने केलेले आहे. त्यामुळे तटस्थ भूमिकेतून भारतीय रेल्वे कार्य प्रणालीचा अभ्यास करण्याची संधीसुद्धा मिळाली.

भारतीय रेल्वेच्या 'रेल पथ नियमावली' (पर्मनंट वे मॅन्युअल) ची निर्मिती यशवंत पटवर्धन (पश्चिम रेल्वेचे तत्कालीन मुख्य अभियंता) यांच्या नेतृत्वाखाली नेहरूकाळात झाली. अर्थात कल्पकता आणि मूलभूत विचार करण्याचा अभाव किंवा अनास्था यामुळे या प्रचंड ग्रंथाचा पाया आणि आधार ब्रिटिश रेल्वेचे 'पर्मनंट वे मॅन्युअल' हाच असल्याचे प्रतीत होते. या नियमावलीत वेळोवेळी जुजबी सुधारणा केल्या गेल्या परंतु मूळ रचना जवळपास कायम होती.

भारतीय रेल्वेच्या या तांत्रिक मापदंडात आमूलाग्र बदल जून २०२० मधे केला गेला या सुधारणांचे शत प्रतिशत श्रेय माननीय नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीलाच जाते. जून २०२० पर्यंत मापदंड निश्चिती करण्याची पद्धत म्हणजे, जी गोष्ट न्यूनतम प्रयत्नांची सहजगत्या साध्य होते त्यालाच मापदंड अथवा मानक प्रस्थापित करणे अशी होती. विद्यमान मानकापेक्षा उच्च स्तरावरील मानक ध्येय ठेवून ते प्राप्त करण्यासाठी अथक यथायोग्य प्रयत्न करणे याचा पूर्ण अभाव होता, या ग्रंथाची सुधारित आवृत्ती तयार करताना देखील नोकरशाहीने आपल्या धूर्तपणाची चुणूक दाखविली आहे. अत्यंत महत्वाचे असे काही मापदंड यथास्थित राखून, पळवाट मोकळी ठेवली आहे.

माझ्या मते या सुधारणा नोकरशाहीने अनिच्छेनेच केल्या असाव्यात. पण आता पर्याय नाही. स्वीकाराव्याच लागतील. भारतीय रेल्वे आणि भारतीय प्रजेच्या दुर्दैवाने आजपर्यंत या विभागाला जे मंत्री लाभले त्यांनी केवळ आपल्या सीमित आणि संकुचित (बिहार आणि पश्चिम बंगाल केंद्रित) मानसिकतेतून काम केले आहे. जागतिक दृष्टीचा अभाव आणि कूपमंडूक वृत्ती यापुढे काय करणार. सन्माननीय अपवाद सुरेश प्रभू आणि राम नाईक. अर्थात या दोन्ही मंत्र्यांच्या काळात सुधारणा करण्यास नोकरशाहीचा किती विरोध होता याचा स्वानुभव आहे.

भारतात सर्वसाधारणपणे कोणत्याही वाहनात (कदाचित विमाने हा अपवाद असू शकतो) अधिकृत क्षमतेपेक्षा अधिक माल / प्रवासी भरण्याची प्रथा प्रचलित, जनमान्य आणि काही प्रमाणात अप्रत्यक्षपणे राजमान्य आहे. त्याला भारतीय रेल्वे अपवाद नाही. तांत्रिक बाबीत अनभिज्ञ (साध्यासोप्या मराठी भाषेत अडाणी) असलेली व्यक्ती मंत्रिपदावर नियुक्त झाल्यावर काय अनर्थ करू शकते याचे ज्वलंत उदाहरण. ते लालूप्रसाद यादव यांच्या कार्यकाळात घडले.

वातानुकूलित आणि अधिक गतीने मार्गक्रमण करणाऱ्या रेल्वे गाड्या विकसित करणे तांत्रिक प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु भारतातील रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाचे सर्वेक्षण केले तर असे प्रतीत होते की बहुसंख्य प्रवासी हे स्थलांतरित मजूर असतात. या प्रवाशांची प्राथमिकता सुखद वातानुकूलित डब्यातील गतिमान प्रवास ही कधीच नसते. स्वस्त आणि शक्य झाल्यास फुकट (बंगाल, उत्तर प्रदेश, बिहारमधील स्वानुभव) प्रवास याला महत्व अधिक आहे. अर्थात गाडी आणि स्वच्छतागृह यांची नियमित सफाई व क्षमतेनुसार प्रवासी संख्या असणे या माफक अपेक्षाही असतात. यामुळे रेल्वेची प्राथमिकता सर्व सामान्य प्रजेला केंद्रबिंदू ठेवणे हीच असावी या मताशी मी सहमत आहे शिवाय २४ ते ४८ तासाच्या प्रवास कालावधीत दोन ते चार तास कमी वेळ लागला तर प्रवाशांच्या दैनंदिन जीवनात काही मोठी क्रांती होणार नाही. परंतु २४ तासांच्या प्रवासाची वेळ १० ते १२ तास झाली तर काहीतरी प्रगती झाली आहे असे सिद्ध होईल जे सद्यपरिस्थितीत जवळ जवळ अशक्यप्राय आहे. यावर एकच उपाय आहे तो म्हणजे गतिमान (बुलेट ट्रेन नाही) गाड्यांकरिता वेगळ्या मार्गिका स्थापित करणे. हा उपाय खर्चिक आणि अमलात आणण्यास दीर्घ कालावधी लागणारा आहे. परंतु दुसरा पर्याय नाही.

संकेत (सिग्नल) प्रणालीत बिघाड / दोष निर्माण झाल्यास पुढील मार्गक्रमण करण्यासाठी चालकास विहित नमुन्यात लिखित स्वरूपात अधिकृतता दिली जाते व त्याची पोचपावती घेतली जाते. याचे उल्लंघन केल्यास त्याचे उत्तरदायित्व मात्र चालकावरच असते. पश्चिम बंगालमधील अपघातात अशी अधिकृतता दिली होती का याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

प्रगत देशातील अनेक रेल्वे आस्थापनात भारतीय रेल्वेच्या प्रचलित सिग्नल प्रणालीपेक्षा अधिक सुरक्षित प्रणालीचा वापर केला जातो. परंतु अशी प्रणाली भारतात सार्वत्रिकरीत्या स्थापित करणे विशिष्ट सामाजिक परिस्थितीमुळे जवळपास असंभव आहे. विद्युतीकरणाच्या सुरुवातीच्या काळात पश्चिम बंगालमध्ये रेल्वेसाठी स्थापित खास विद्युत वाहिन्यांची चोरी झाल्याच्या सुरस कथा आहेत. समाजाच्या विविध घटकांकडून हिंसेचे उघडपणे किंवा छुप्या पद्धतीने समर्थन केले जात असल्यामुळे आणि इतर सामाजिक असंतोषामुळे कायद्याचा धाक राहिलेला नाही. याचा परिणाम रेल्वे कार्यप्रणालीवरही झाला असल्याचे प्रतीत होते.

भारतीय रेल्वे जगातील अत्यधिक काम करावे लागणारी आणि अत्यधिक भार वाहावा लागणारी आस्थापना आहे. एक किलोमीटर लांबीच्या रेल्वेचे देशाचा भूभाग आणि लोकसंख्या याचे गुणोत्तर काढल्यास वरील बाब अधिक स्पष्ट होते. क्षेत्रफळाच्या संदर्भात हे गुणोत्तर सरासरी आहे. परंतु सर्वच देशांच्या काही भागात हे कमी किंवा अधिक असू शकते.



यातून, भारतीय रेल्वेस किती मोठा टप्पा गाठावा लागणार आहे हे स्पष्ट होते. चीन आणि भारताची लोकसंख्या जवळपास सारखीच आहे. पण रेल्वे व लोकसंख्येच्या निकषावर विचार केला असता चीनशी बरोबरी करण्यास भारतात अतिरिक्त ८८,०१६ कि मी रेल्वेमार्गाची आवश्यकता आहे. इतर देशांशी तुलना करणे व्यर्थ आहे.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या यशस्वी अमलबजावणीमुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार शिक्षण मिळणार- कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० कार्यशाळेचे शानदार उद्घाटन, अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांची उपस्थिती

लातूर :- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या यशस्वी अंमलबजावणीमूळे शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील दर्जेदार शिक्षण मिळणार असून विद्यापीठ, संस्था आणि महाविद्यालयाच्या सक्रिय सहभागाने याची यशस्वीता मिळणार असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण समिती, आय.क्यु.ए.सी.), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या व्होकेशनल सभागृहामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०: पदवी प्रथम वर्ष अभ्यासक्रम रचना आणि प्रवेश प्रक्रिया या विषयावर संस्था अंतर्गत येणाऱ्या शाळा, विद्यालय, कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर विचारमंचावर बिजभाषक म्हणून अधिष्ठाता डॉ.एम.के.पाटील, शिक्षण सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर, शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रवीणजी सरदेशमुख, संचालक डॉ.दिगंबर नेटके, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.डी.एन.मोरे, अधिष्ठाता डॉ.डी.एम.खंदारे, उपकेंद्र संचालक डॉ.राजेश शिंदे, उपाध्यक्ष माधवराव पाटील (तपसे चिंचोलीकर), सचिव माधवराव पाटील (टाकळीकर), सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे, संचालक राजेश्वर बुके, संचालक बस्वराज येरटे, बाबुराव तरगुडे, संचालक काशिनाथ साखरे, संचालक गुरुलिंगप्पा धाराशिवे, डॉ.राजाराम माने, अधिव्याखाता डॉ. सूचित्रा जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई आणि समन्वयक डॉ. दीपक चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचा प्रारंभ जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाला. त्यानंतर प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार, डॉ.गीता गीरवलकर, प्रा.सरस्वती बोरगावकर आणि चमुनी गणेश स्तवन, स्वागत गीत आणि विद्यापीठ गीत सादर केले. पुढे बोलताना कुलगुरू डॉ.मनोहर चासकर म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना देणारे





व्यवसायाभमुख शिक्षण देणारे आहे. या प्रणालीच्या मूलभूत सुधारणांच्या केंद्रस्थानी शिक्षक असून विद्यार्थ्यांना यात दर्जेदार शिक्षण तंत्रज्ञान कुशलता, रोजगार क्षमता, बहुभाषिक, सुप्त गुणांना चालना आणि उद्याच्या भारताचे उज्वल भवितव्य घडविणारा विचार आहे. या शिक्षणप्रणालीत लवचिकता आणि आंतरविद्याशाखीय संकल्पना ही कल्पना, तार्किक विचार, नैतिक मूल्य, जीवनमूल्य, आधुनिक काळातील माहिती तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणारी आहे. देशाचे दूरदृष्टीत्व या शिक्षण प्रणालीतून लक्षात येते असेही ते म्हणाले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सहसंचालक डॉ.किरणकुमार बोंदर म्हणाले की, व्यक्ती विकास, समाज परिवर्तन आणि राष्ट्रीय विकासाचा पाया हे उच्च शिक्षण असते. वैश्विक पातळीवर नेतृत्व निर्माण करण्याकरिता विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण हे उत्तम व दर्जेदार पद्धतीने द्यायला हवे. सर्वांसाठी सर्वसमावेशक आणि समान गुणवत्तेचे शिक्षण सुनिश्चित करून निरंतर शिक्षणाची सोय नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात आहे. यावेळी त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील आकृतीबंध विषयाचे कार्यभार, नव्याने झालेली परिवर्तने, श्रेयांक पद्धती, भारतीय ज्ञान परंपरा याविषयी सभागृहाला अवगत करून दिले. यावेळी बोलताना परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ.दिगंबर नेटके म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण हे आनंददायी, व्यक्तीच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य निर्माण करणारे आहे. विद्यार्थ्यांचे अविरत मूल्यमापन करून माणूस घडवण्याची क्रिया या शिक्षणातून होणार आहे असे ते म्हणाले यावेळी बोलताना प्रविणजी सरदेशमुख म्हणाले की, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शिक्षणामुळे चारित्र्य घडले पाहिजे. या धोरणात विद्यार्थी नीतिवान, तर्कशुद्ध, सहानुभूतीशील आणि सुहृदय बनतील याची काळजी घेतली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी लाभदायी, समाधानकारक आणि रोजगार मिळवण्यासाठी तयार होतील याची काळजी घेतली आहे. प्राचीन आणि सनातन भारतीय ज्ञान व विचारांच्या समृद्ध परंपरा लक्षात घेऊन हे धोरण तयार केले आहे. यावेळी बोलताना संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरा ही अति प्राचीन आणि समृद्ध अशी वारसा सांगणारी ज्ञान परंपरा आहे. या ज्ञानपरंपरा आणि गुरुकुल परंपरेत अनुभवजन्य ज्ञानाला विशेष महत्त्व होते. विज्ञान आणि आध्यात्माचा समन्वय साधणारी ही ज्ञान परंपरा होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून या ज्ञानपरंपरेचे पुनरुज्जीवन झाले आहे असे सांगून त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर अध्ययन आणि संशोधन केंद्र चालवण्याकरिता परवानगी द्यावी अशी विनंती सुद्धा त्यांनी यावेळी केली. अध्यक्षीय समारोपिय मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. भारताच्या सर्व तऱ्हेच्या मूळ समस्या दर्जेदार शिक्षणातून नष्ट होऊ शकतात. समाजाच्या आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, भविष्यातील होणाऱ्या बदलांना सामोरे जावे आणि अंतर्मुख होऊन भावी पिढ्यांनी देशाच्या उज्वल भविष्याचा वेध घ्यावा याकरिता आदर्श मूल्य रुजवण्यासाठी मूल्याआधारित शिक्षण प्रणाली विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मूल्य रुजवणारा शिक्षक हा केंद्रस्थानी ठेवून भारतीय ज्ञान परंपरेला आधारभूत अशी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण निर्मिती झाली आहे असेही ते म्हणाले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.संजय गवई यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.रत्नाकर बेडगे, प्रा.धोंडीबा भुरे यांनी तर आभार डॉ.बाळासाहेब गोडबोले यांनी मानले. या कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पदवी प्रथम वर्ष अभ्यास करून रचना व प्रवेश प्रक्रिया या संदर्भात विविध तज्ञांचे मार्गदर्शन संपन्न झाले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि क्रीडा विभागाच्यावतीने मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. या कार्यशाळेला श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था पदाधिकारी, देशीकेंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक रूपसिंग सगर, महात्मा बसवेश्वर प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुनीता पुरी, शंभूलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी कोळी, शंभूलिंग शिवाचार्य प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक युवराज स्वामी आणि निळकंठेश्वर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री ठवळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संखेने सहभागी झाले होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, समन्वयक डॉ. दीपक चाटे, आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, सदस्य डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. दिनेश मौने, डॉ. यशवंत वळवी, डॉ. आनंद शेवाळे, डॉ. नल्ला भास्कररेड्डी, डॉ. सिद्राम डोंगरगे, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रमेश तडवी, डॉ. विजयकुमार सोनी, प्रा. धोंडीबा भुरे, डॉ. शितल येरुळे, प्रा. वनिता पाटील, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. नितीन वाणी, डॉ. अश्विनी रोडे, प्रा. व्यंकट दुडिले आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ अभय कुमार आणि एनसीसी कॅडेट यांनी परिश्रम घेतले.

# कोरम मॉलतर्फे आयोजित मॉन्सून मॅरेथॉनमध्ये ११०० जण सहभागी, फिटनेसला चालना

## सक्रिय जीवनशैली आणि सामाजिक उपक्रमांना चालना





ठाणे / प्रतिनिधी :- कोरम मॉल या ठाण्यातील आघाडीच्या शॉपिंग आणि एंटरटेनमेंट डेस्टिनेशनने आज १५ किमी मॉन्सून मॅरेथॉनचे आयोजन केले होते. या मॅरेथॉनमध्ये प्रोफेशनल्स, आंतरराष्ट्रीय धावपटू आणि दिव्यांग व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. या मॅरेथॉनद्वारे फिटनेस आणि सामाजिक सहभागाचा प्रसार करण्याचे ध्येय ठेवण्यात आले होते. त्यात ५ किमी, १० किमी आणि १५ किमी रनचे आयोजन करण्यात आले होते तसेच वेगवेगळे वयोगट आणि फिटनेस पातळी असलेले ११०० जण त्यात सहभागी झाले होते. सकाळी लवकर सुरू झालेल्या या मॅरेथॉनसाठी सर्व जण कोरम मॉल येथे जमा झाले होते व तिथूनच मॅरेथॉनची सुरुवात करण्यात आली. मॉलने यापूर्वी विविध विक्रम नोंदवलेल्यांच्या सहकार्याने मॅरेथॉनचे आयोजन केले तसेच नव्या सहभागींना प्रेरणा दिली. यावेळी हीना भानुशाली आणि विवेक सोनी यांच्यासारख्या तज्ज्ञांनी फंक्शन्ल ट्रेनिंग घेतले तसेच फिटनेसकडे पाहाण्याचा दृष्टीकोन ताकद, चपळाई आणि सहनशीलता यांनी परिपूर्ण असावा असे सांगितले. ठाण्यातील निसर्गरम्य मार्गाने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. उत्साही स्वयंसेवक आणि प्रेक्षकांनी सहभागींना जोरदार चीयर करत फिनिशिंग लाइनपर्यंत टिकून राहाण्याचा जोश वाढवला. मार्गावर ठिकेठिकाणी पिण्याचे पाणी तसेच वैद्यकीय वस्तूंची सोय करून सहभागी रनर्सची सुरक्षा राखण्यात आली. मॅरेथॉननंतर कोरम मॉल येथे झालेल्या सेलिब्रेशनमध्ये लाइव्ह म्युझिक, आकर्षक उपक्रम तसेच रनर्ससाठी चविष्ट आणि पोषक अल्पोपहार ठेवण्यात आला होता. सहभागी झालेल्या प्रत्येकाला फिनिशर मेडल आणि त्यांच्या कामगिरीची प्रशंसा करणारे प्रमाणपत्र देण्यात आले. 'मॉन्सून मॅरेथॉन आयोजित करून आम्ही समाजात सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीचा प्रसार करण्याचे आमचे ध्येय जपले आहे,' असे देवा ज्योतुला, उपाध्यक्ष- रिटेल म्हणाले. 'सर्व वयोगटातील नागरिकांना सहभागी होताना आणि फिटनेस तसेच धावण्याच्या प्रेमासाठी एकत्र येताना पाहून आम्ही भारावून गेलो आहोत. आम्ही सर्व सहभागी, प्रायोजक, स्वयंसेवक आणि स्थानिक समाजाचे त्यांनी दिलेल्या पाठिंब्यासाठी आभारी आहोत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचेही आभारी मानतो. मॉन्सून मॅरेथॉन हा उपक्रम सर्वांच्या सहकार्याने आणि निरोगी जीवनाच्या प्रसारासाठी आयोजित करण्यात आला होता.' हे मॅरेथॉन कोरम मॉलच्या समाजात स्वास्थ्य आणि फिटनेस रूजवण्याच्या मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा आहे.

# बहुजन समाज पार्टीच्या वतीने रक्तदान शिबीर घेऊन छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन




लातूर :- सामाजिक न्यायाचे प्रणेते, आरक्षणाचे जनक, समतावादी लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त आज २६ जून रोजी लातूर जिल्हा बहुजन समाज पार्टीच्या वतीने लातूर येथील राजर्षी शाहू महाराज पुतळा परिसरात भव्य रक्तदान शिबीर घेऊन राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात ४० ते ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या भव्य रक्तदान शिबिराचे उदघाटन पु. भन्ते पाय्यानंदजी थेरो यांच्या हस्ते सकाळी १० वाजता करण्यात आले.यावेळी बसपाचे माजी प्रदेश सचिव व्यंकटेश बरगे, माजी जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. अनिल कांबळे, विद्यमान जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, लातूर विधानसभा अध्यक्ष विकास दंडे, जिल्हा प्रभारी उदय सोनवणे, विनोदभाऊ कोल्हे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स लीगचे सदस्य ॲड. राजेंद्र लातूरकर, ज्येष्ठ पत्रकार रामराव गवळी, महेंद्र कांबळे, ज्योतीराम लामतुरे, अरविंद दामावले, अनिल सूर्यवंशी, संघर्ष कांबळे, ॲड. धम्मदीप बलांडे, सत्यप्रकाश कांबळे, गौतम बनसोडे, बालाजी ओव्हाळ, ॲड. सचिन कोळी, ॲड. भारत ननावरे आदींची प्रमुख उपस्थिती होती

# राज्यकर्त्यांनी राजर्षी शाहू महाराजांची भूमिका स्वीकारावी.! --डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी

अहमदपूर :- राजर्षी शाहू महाराजांनी विसाव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्राचे सामाजिक जीवन ढवळून काढून सामाजिक समतेची प्रतिष्ठापना करण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले.ते एका राज्याचे अधिपती असले तरी त्यांचे मन लोकशाहीवादी होते. वागणूक समतेच्या पुरस्कर्त्याची होती. बहुजन समाजाची व विशेषतः शोषित, पिडीत वर्गाची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांच्या सर्वांगीण उध्दाराचे केलेले कार्य इतिहासात अजरामर असून येथील राज्यकर्त्यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची भूमिका स्वीकारावी तरच ख-या अर्थाने सामाजिक जीवनात समता प्रस्थापित होईल असे प्रतिपादन माजी गटनेते,युवक नेते डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांनी केले.

येथील शाहू महाराज चौक येथे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन सभेचे आयोजन केले होते.या कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून ते बोलत होते. सुरवातीला जयंतीनिमित्त शाहू महाराज चौकात डॉ. सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या प्रसंगी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,सेवा संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा.गोविंद शेळके,माजी जि.प.सदस्य देवानंद मूळे,संभाजी ब्रिगेडचे सिध्दार्थ दापके,मूकेश पाटील,वंचीत आघाडीचे तालूकाध्यक्ष सि.वाय.कांबळेसर,माजी प्राचार्य डॉ.एस.के.खिल्लारे सर,माजी सिनेट सदस्य अँड.अमितभैय्या रेड्डी, बाबासाहेब कांबळे,बालाजी दूगाणे आदींची उपस्थिती होती. या नंतर याच ठिकाणी सि.वाय.कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन सभा संपन्न झाली. पूढे बोलताना डॉ. सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की,सामाजिक चळवळीत काम करताना बोलक्या कार्यकर्त्यां ऐवजी करते कार्यकर्ते खूप महत्वाचे आहेत.समाजाला स्वतः आचरण करत आदर्श जीवन जगणाऱ्या, सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देवून काम करणा-या यूवकांची खरी गरज असल्याचे सांगितले. या वेळी उपस्थित माजी प्राचार्य डॉ.एस.के.खिल्लारे सर,गोपीनाथराव जोंधळे, अँड.अमितभैय्या रेड्डी आदींची समायोचीत भाषणे झाली.तर सि.पी.कांबळेसर यांनी अध्यक्षीय समारोप केला. तसेच येथील सिद्धार्थ कॉलनी येथील बूध्द विहार परिसरात जयंती निमित्त वृक्षारोपण करण्यात आले.ग्रामीण रूग्णालयात फळ वाटप करण्यात आले.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे सूध्दा जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.





कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी दूगाणे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन धनंजय कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती समिती अध्यक्ष रोहीत कांबळे, उपाध्यक्ष संदेश गायकवाड, सचिव आकाश भालेराव, कोषाध्यक्ष अभिजित तुरेवले, कार्याध्यक्ष वैभव इंगळे,सदस्य-अजय वाघमारे ,अक्षय गायकवाड,बंटी गायकवाड,अभिलाष ससाणे, पंकज भालेराव, गौरव गायकवाड,विनोद गायकवाड, धम्मसागर वाघमारे,संघपाल गायकवाड स्वागत अध्यक्ष- विनोद गायकवाड,प्रदीप सोनकांबळे,तसेच आयोजक अँड,राजपाल गायकवाड,धनंजय कांबळे आदींनी पुढाकार घेतला.



बहुजनांसाठी विविध योजना राबविणारे, माणसातील राजा आणि आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना यु.डी.गायकवाड, बसवंतअप्पा उबाळे, अशोक देडे आदी.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५०व्या जयंती निमित्त १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप





लातूर :– मनोधैर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५०व्या जयंती निमित्त अध्यक्ष. गायकवाड पवनकुमार व उपाध्यक्ष. शेख सिराज यांच्या पुढाकारातून भारत विदयालय लेबर कॉलनी, लातूर. व फातेमा शेख मनपा उर्दू शाळा क्र १३ काझी मोहल्ला, लातूर येथे १५०विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी उप महापौर. कैलासजी कांबळे, माजी नगरसेवक. इम्रानजी सय्यद, अनुसूचित जाती काँग्रेसचे लातूर शहर अध्यक्ष. प्रा. प्रवीणजी कांबळे, महाराष्ट्र मुस्लिम मेहत्तर सफाई कामगार संघटनेचे सं.अध्यक्ष. सज्जादभाई शेख, महाराष्ट्र जनएकता संघटनेचे सं. अध्यक्ष. शेख इरफानभाई,दोन्ही विदयालयाचे मुख्याध्यापक, कुरूम सर, बरुडे सर, शेख असलम, शेख फारुख, शेख जुबेर, संजय सुरवसे, बब्रुवान गायकवाड,जब्बारभाई शेख,इलियाज शेख दोन्ही विदयालया तील सर्व शिक्षक व शिक्षिका आदी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते...

# गर्भपातासाठी शासनाच्या मंजुरीनंतरही एसओपीची अंमलबजावणी का नाही ?

## ॲड.. सोनिया गजभिये यांच्या प्रयत्नांना यश

नागपूर : – मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार आता २४ आठवड्यांपलीकडील वैद्यकीय गर्भपात करण्याच्या मानक मार्गदर्शक कार्यपद्धतीस (एसओपी) राज्य शासनाने मंजुरी दिली आहे, अशी माहिती राज्य शासनाने हायकोर्टाला मागील सुनावणीत दिली होती. पीडितेने दाखल केलेल्या याचिकेवर राज्य शासनाने एसओपी आरोग्य विभागासह इतर सर्व संबंधित विभागांना पाठविली नसल्याचे हायकोर्टाच्या निदर्शनास आले. त्यामुळे हायकोर्टाने सरकारी वकिलांना विचारणा केली की, राज्य शासनाने ३ जून रोजी एसओपी जारी केली असताना या एसओपीची अंमलबजावणी आजपर्यंत का करण्यात आली नाही? एसओपी पोलीस विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व आरोग्य विभाग, सरकारी रुग्णालये, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणासह सर्व संबंधित विभागांना पाठवावी, असे आदेश हायकोर्टाने दिले. हायकोर्टाने येत्या १६ जुलैपर्यंत राज्य सरकारला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. याप्रकरणी न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

२६ आठवडे सहा दिवसांचा गर्भ नष्ट करण्यासाठी महिलेने हायकोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर हायकोर्टाने दाखल याचिकेचे जनहित याचिकेत रूपांतर करण्याचे आदेश हायकोर्टाच्या रजिस्ट्रीला दिले होते.



तसेच २० ते २४ आठवड्यांपलीकडील गर्भ राहिल्यास तो नष्ट करण्यासाठी स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर (एसओपी) तयार करावी, असे आदेशही राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषध प्रशासन विभागाला दिले होते. यानुसार राज्य शासनाने एसओपी तयार करून या अंतर्गत २४ आठवड्यांपलीकडील वैद्यकीय गर्भपात करण्यास मान्यता दिली आहे.

दरम्यान लग्नाचे आमिष देऊन युवतीला गर्भवती केल्याप्रकरणी हायकोटनि मेडिकल बोर्डासह डीन व जिल्हा आरोग्याधिकारी यांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे आदेश दिले होते. सावनेर येथील बावीस वर्षीय युवतीचे डब्ल्यूसीएलच्या एका कर्मचारी युवकासोबत प्रेमसंबंध होते. युवकाने तिला लग्नाचे आमिष देऊन शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यामुळे युवती गर्भवती राहिली. तिने ९ जून २०२४ रोजी तपासणी केली असता २६ आठवड्यांची गर्भवती असल्याचे तिला समजले. गर्भ नष्ट करण्यासाठी फिर्यादी युवतीने हायकोर्टात याचिका दाखल केली होती.

मेडिकल बोर्डाने युवतीला गर्भपात करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यामुळे हायकोर्टाने याचिका निकाली काढत तत्काळ सर्व संबंधित विभागांना एसओपी पाठविण्याचे आदेश दिले. युवतीतर्फे ॲड. सोनिया गजभिये, राज्य शासनातर्फे ॲड. देवेंद्र चव्हाण, ॲड. आशिप कडूकर व केंद्र सरकारतर्फे ॲड. नंदेश देशपांडे यांनी बाजू मांडली. हायकोर्टाची विचारणा: तत्काळ सरकारी रुग्णालयांसह सर्व संबंधित विभागांना एसपीओ जारी करा.

# ए एच टी यु कडून २ बाल कामगारांची सुटका व हॉटेल चालकां विरुद्ध कारवाई

लातूर :– अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (ए एच टी यु) लातूर कडून अल्पवयीन बालकास कामगार म्हणून ठेवणाऱ्या २ हॉटेल आस्थापना विरुद्ध गुन्हा दाखल करून २ अल्पवयीन बालकांची सुटका करण्यात आली.

१८ वर्षाखालील बालकास स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी, वस्तू, सेवांची विक्री करण्यासाठी व नोकरीच्या उद्देशाने स्वतःच्या आस्थापनेमध्ये गुंतवून ठेवणे, बालकास गुलाम म्हणून वागविणे, बालकाची कमाई रोखून ठेवणे, बालकाच्या कमाईचा स्वतःच्या हेतूसाठी वापर करणे, बालकांकडून शारीरिक श्रम करून घेणे अशा प्रकरणी बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ व बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ अन्वये संबंधित स्थापना चालका विरुद्ध कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.


ए एच टी यु युनिटला काही आस्थापनांमध्ये बालकांचा कामगार म्हणून वापर करण्यात येत आहे याबाबत गुप्त माहिती मिळाली. माहितीची खात्री करून २ शासकीय पंचासह मध्यवर्ती बस स्थानक लातूर जवळील २ हॉटेल आस्थापनांवर वर छापा टाकला असता १४ व १५ वर्षीय उत्तर प्रदेश राज्यातील २ बालकास बालकामगार म्हणून ठेवल्याचे निदर्शनास आले. दोन्ही बालकांना ताब्यात घेऊन बाल न्याय मंडळा पुढे हजर केले असता त्यांची रवानगी बाल गृहात करण्यात आली आहे.




सदर प्रकरणी सोलापूर चिकन चायनीज सेंटर मध्यवर्ती बस स्थानका जवळ, हॉटेल चालक फुरकान मुस्ताक कुरेशी रा ६० फुटी रोड, लातूर व हॉटेल टेस्टी झोन काँग्रेस भवन च्या मागे हॉटेल चालक मिनाज युनूस घावरी रा खोरी गल्ली लातूर यांचे विरुद्ध गांधी चौक येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पो हवा चित्तलवाड हे करीत आहेत. सदरची कारवाई श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक, लातूर, श्री अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनात श्री दयानंद पाटील सहा पोलीस निरीक्षक, श्री सुभाष सूर्यवंशी पो उप निरीक्षक, पोलीस अंमलदार सदानंद योगी, प्रकाश जाधव सुदामती वंगे, लता गिरी, चालक मनियार सर्व नेमणूक ए एच टी यु युनिट लातूर व चाईल्ड लाईनच्या अलका सन्मुखराव यांच्या पथकाने केली आहे.

# वर्ल्ड जर्नल ऑफ व्हायरॉलॉजी या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये डॉ. बी. एस. नागोबा, डॉ. अभिजीत रायते यांचा लेख प्रसिध्द

लातूर : – लातूर येथील एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाचे उपधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील समर्पित शोधकार्य व संशोधनाची दखल घेवून त्यांना अमेरिकेतून प्रसिध्द होणा–या वर्ल्ड जर्नल ऑफ व्हायरॉलॉजी या पबमेड व पबमेड सेन्ट्रल मध्ये अंतरभूत असलेल्या आंतरराष्ट्रीय जर्नल कडून हिपॅटायटीस ई व्हायरस इन्फेक्शन या विषयावरती संपदाकीय लिहण्यासाठी निमंत्रीत करण्यात आले होते.





डॉ. बी. एस. नागोबा आणि सर्जरी विभागातील प्राध्यापक डॉ. अभिजीत रायते यांनी पुर्ण केला असून हा संपादकीय लेख जून २०२४ च्या अंकामध्ये प्रसिध्द करण्यात आला. आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये संपादकीय लिहण्यासाठी भारतीयांना संधी मिळणे ही सन्मानाची गोष्ट असून तो मान डॉ. बी. एस. नागोबा व डॉ. अभिजीत रायते यांनी मिळवला.

डॉ. बी. एस. नागोबा व डॉ. अभिजीत रायते यांच्या यशाबद्दल माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. वि. दा. कराड, कार्यकारी अध्यक्ष व व्यवस्थापकीय विश्वस्त प्रा. राहूल कराड, एम.आय.एम.एस.आर. वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक आ. रमेशअप्पा कराड, अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, डॉ. सरीता मंत्री, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. बी.डी. आडगावकर, डॉ. चंद्रकला डावळे, डॉ. अजय गावकरे, डॉ. सचिन भावठाणकर, डॉ. पी. बी. केंद्रे, विनोद जोगदंड, विश्वनाथ माने, दिपक बदने व इतरांनी अभिनंदन केले.

# सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

## व्याख्याते विवेक सौताडेकर यांनी उलघडला राजर्षी शाहू महाराजांचा जीवनपट

लातूर :– राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीदिनी समाज कल्याण विभागाच्या वतीने सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने आयोजित विविध उपक्रमांना विद्यार्थी, नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे शासकीय निवासी व शासकीय वसतिगृहातील शाळेतील गुणवंत विद्यार्थी व त्यांचे पालक यांचा सन्मान, तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित व्याख्यान, व्यसनमुक्ती विषयक मार्गदर्शन, वृक्षारोपण आदी विविध कार्यक्रमांचे यावेळी आयोजन करण्यात आले होते. समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, इतिहास अभ्यासक तथा व्याख्याते विवेक सौताडेकर, व्यसनमुक्ती विषयक मार्गदर्शक डॉ. सिध्देश्वर हुकिरे, दलितमित्र पुरस्कारप्राप्त संजय जमदाडे, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज भूषण पुरस्कारप्राप्त ॲड. अंगद गायकवाड, ॲड. एस.एन. बोडके, समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त कार्यालयातील समाज कल्याण अधिकारी विकास केंद्रे यावेळी उपस्थित होते. सन २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविलेले शासकीय निवासी शाळा आणि शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना वृक्षाचे रोप, प्रमाणपत्र आणि गुलाबपुष्प देवून सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांना पुढील शिक्षणसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.






राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची मुहूर्तमेढ रोवली : विवेक सौताडेकर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे दूरदर्शी आणि विद्वान राजे होते. सामाजिक समतेचा विचार प्रत्यक्षात कृतीत आणून त्यांनी सामाजिक न्यायाची मुहूर्तमेढ रोवली. अस्पृश्य, दलित समाजासाठी शिक्षणाची दारे उघडण्यासोबतच या घटकाला शिक्षण घेता यावे, यासाठी वसतिगृहे, शिष्यवृत्ती सुरु केली. शिक्षणाला चालना देण्यासाठी शिक्षण सक्तीचे केले. कला, साहित्य, क्रीडा क्षेत्राला राजाश्रय देवून गुणवंतांना प्रोत्साहन देण्याचे काम राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केले. त्यांनी केलेले काम आणि घेतलेले अनेक निर्णय आजही आपल्यासाठी दिशादर्शक असून प्रत्येकाने त्यांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे इतिहास अभ्यासक तथा व्याख्याते विवेक सौताडेकर यांनी सांगितले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा आदर्श सर्वांनी घ्यावा : अविनाश देवसटवार

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे एक आदर्श राजे होते. माणसाने माणसासारखे वागावे आणि माणसाला माणसासारखे वागवावे, हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे काम त्यांनी केले. समाज सुधारणेसाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही आपल्यासाठी आदर्शवत असून यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. त्याच्या कार्याची, विचारांची प्रेरणा घेवून आणि त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकाने काम करण्याची गरज असल्याचे समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार यांनी सांगितले. तसेच प्रत्येकाने व्यसनापासून दूर राहावे, देशाचे सुजाण नागरिक म्हणून वाईट कामांपासून दूर राहून विधायक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले. प्रास्ताविकात समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी सामाजिक न्याय दिनाच्या आयोजनामागील भूमिका विषद केली. यावेळी उपस्थितांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनी वैष्णवी संतोष खडसे हिने व्यसनमुक्तीचा संदेश देणारी कविता सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश सास्तूरकर यांनी केले, तर दत्तात्रय मुखम यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त दत्त मंदिर परिसरात वृक्षारोपण



लातूर :---- राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त दत्त मंदिर परिसरात नागरिकांच्या वतीने वृक्षारोपण संपन्न आज राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्थनिक नागरिकांनी लातूर शहर पूर्व भागातील गरुड चौक महादेव नगर येथील दत्त मंदिर परिसरत चाफा,जासवंद,बेल,शम्मी,गोकर्णा, बदाम,पिंपळा ची झाडे लावून जयंती साजरी करण्यात आली या वेळी स्थानिक नागरिक गंगाधर गंगणे, सौ रेखा बाबर, सौ राधिका राठोड,केवळबाई घोलप,दीपक गंगणे, शिवाजी सुर्यवंशी, सौ रुपाबाई गंगणे, सौ महानंदा मोरे,सौ रुक्मिणी गंगणे,नंदाबाई मुळे,अडणे इत्यादी नागरिक उपस्थित होते

# शरद पवारांपाठोपाठ राहुल गांधीही पंढरीत?

मुंबई : प्रतिनिधी अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या पंढरपूरच्या विठुरायाचा आशीर्वाद पदरात पाडून घेण्यासाठी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी महाराष्ट्रात येण्याची शक्यता आहे. येत्या १७ जुलैला आषाढी एकादशी आहे. त्यासाठी राज्यभरातून संतांच्या पालख्या या पंढरपूरला जात असतात. पंढरीला जाणारी आषाढी वारी ही महाराष्ट्रातील अनेक वर्षांपासून चालत आलेली महत्त्वाची परंपरा राहिली आहे. पंढरीची वारी हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा सोहळा मानला जातो.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE